# ई-बुकाचा बुक्का लावा कपाळी...

28 Dec 2010, 0246 hrs IST

सृजनशक्तीवर परिणाम होईल का, प्रश्नाला स्पर्शच नाही

नव्या लेखन तंत्रज्ञानाचा लेखनावर काय परिणाम होईल?

टीम मटा । महाकवी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर साहित्यनगर, ठाणे

नवनव्या तंत्रांच्या, तंत्रज्ञानाच्या आगमनाचा परिणाम लेखनकलेवर होणे अपरिहार्य असून त्यामुळे लेखनकलेचे नुकसान होईल, अशी भीती बाळगण्याचे काहीच कारण नाही. इंटरनेट, सोशल नेटवर्किंग, ई-बुक अशी ताज्या पिढीच्या हाती आलेली साधने लेखनव्यवहारासाठी, लेखकांसाठी फायदेशीरच आहेत, अशी ग्वाही या संबंधीचा अभ्यास असणाऱ्यांनी दिली.

संवाद तंत्रज्ञानाचा मराठी लेखनकलेवर होणारा परिणाम या विषयावरील परिसंवाद सोमवारी आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या अनुपस्थितीमुळे विज्ञान लेखक निरंजन घाटे यांच्याकडे या परिसंवादाचे अध्यक्षपद सोपवण्यात आले होते. लेखक राजीव तांबे, माध्यमतज्ज्ञ समीरण वाळवेकर, पत्रकार यमाजी मालकर तसेच 'मायविश्व डॉट कॉम'चे मंदार जोगळेकर या परिसंवादात सहभागी झाले होते. ही चर्चा प्रामुख्याने लेखनाच्या बाह्य तंत्राभोवतीच घोटाळली, संवाद तंत्रज्ञानाचा सृजनशक्तीवर काही परिणाम होईल का, या प्रश्नाला स्पर्श झालाच नाही.

पेनाने लिहिणे, कम्प्युटरवर टाइप करणे आणि ध्वनिमुद्रणाची साथ घेऊन लिहिणे यात माझे प्राधान्य पेनाने लिहिण्यास आहे. त्यात मला सर्वाधिक समाधान मिळते. अर्थात हा माझा वैयक्तिक अनुभव आहे. मात्र एकंदर विचार करता नव्या तंत्रज्ञानाने लेखकांतील उत्स्फूर्तता वाढेल, त्याने वेळ-पैसा वाचेल, असे वाळवेकर म्हणाले. त्यामुळे नव्या तंत्रास सामोरे जाऊ या, असे आवाहन त्यांनी केले.

कम्प्युटरवर मराठी टायपिंग करण्यासाठी स्वतंत्र व सुसंगत कीबोर्ड नाही, फाँट नाही, याकडे यमाजी मालकर यांनी लक्ष वेधले. तसेच, आजमितीस कम्प्युटर, इंटरनेट यापासून मैलोगणती दूर असलेल्या देशातील ७० टक्के लोकांना साहित्य व्यवहारातून वगळणार का? असा प्रश्नही त्यांनी केला.

मुलांच्या मनोविश्वाची नीट ओळख असलेले राजीव तांबे यांनी फेसबुक, मोबाइल, ऑर्कुट यावर होणाऱ्या संवादात वापरल्या जाणाऱ्या भाषेकडे लक्ष वेधले. त्यावर वापरली जाणारी भाषा आजच्या पिढीची आहे. त्यातून संवाद साधणे सोपे जात असल्यास ते ती वापरणारच, असा मुद्दा त्यांनी मांडला.

ई-बुकची संकल्पना मराठीत रुजवण्यासाठी प्रयत्न करणारे मंदार जोगळेकर यांनी या नव्या तंत्राचे अनेक फायदे विषद केले. वाचनसंस्कृती लोप पावत असल्याची ओरड अनेकजण करीत आहेत, मात्र वाचनसंस्कृतीची माध्यमे बदलत आहेत, हे त्यांनी लक्षात घ्यावे, असा मुद्दा जोगळेकर यांनी मांडला. ई-बुकचे उदाहरण देत, या नव्या तंत्राचा फायदा वाचनसंस्कृतीला होईल, असे भाकित त्यांनी वर्तवले. ई-बुकमुळे छपाईचा खर्च वजा होईल. त्याचा लाभ प्रकाशक, लेखकांना होईल. मात्र त्यासाठी ई-बुकची पायरसी रोखावी लागेल, असे त्यांनी नमूद केले.